*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org,9226563052*

# UNIT 6
# MAJOR CONCEPTS IN INDIAN MORAL THOUGHTS

## प्रकरण सहावे
## भारतीय नैतिक विचारांमधील मुख्य संकल्पना



**प्रस्तावना :**

भारतात नीतिविषयक अतिशय सखोल चिंतन झाले.भारतीय नीतिशास्त्र वैदिक हिंदू,बौध्द व जैन अशा सर्व भारतीय तत्वज्ञानातून व्यक्त झालेले आहे.पाश्चात्य नीतिशास्त्राप्रमाणे ते स्वतंत्र नीतिशास्त्र नाही तर ते धर्माशी जोडले आहे.कारण प्राचीन काळी भारतात धर्म आणि नीती हे एकच समजले जात होते.भारतात हिंदू वैदीक तत्वज्ञानात धर्म अधिक प्रभावी होता. म्हणून भारतीय नैतिक विचार हा धार्मिक विचार आहे.थोडक्यात तत्त्वज्ञान (ब्रह्मज्ञान) धर्म आणि नीती यांचा विचार आणि विकास एकत्रितच झाला.

पाश्चात्य नीतिशास्त्रात निरनिराळया तत्वज्ञांनी आणि विचारप्रणालींनी निरनिराळे आदर्श किंवा ध्येये सूचित केली आहेत. सुखवाद्यांनी सुख हे नैतिक ध्येय मानले तर बुध्दिवाद्यांनी व उपयुक्ततावाद्यांनी उपयुक्तता हाच आदर्श मानला तर कर्तव्यवाद्यांनी कर्तव्य हे मानवी जीवनाचे ध्येय मानले.

भारतीय नैतिक विचार मात्र अशी विविध ध्येये मांडीत नाही,तर मानवी जीवनाचा एक निश्चित आराखडा मांडून ते त्याप्रमाणे एक अंतिम ध्येय ते सुचविते.ते ध्येय म्हणजे मुक्ती, मोक्ष.जन्ममरण ही अनंत दु:खांची मालिका आहे. मानवी आत्मा जन्म घेऊन सुखदु:खांच्या चक्रात अडकून पडतो.त्यातून त्याची सुटका होणे कठीण असते.पण अशक्य नसते.या दु:ख मालिकेतून सुटका म्हणजे मोक्ष आणि ' मोक्षासाठी व्यक्ती जे करते ते सर्व नैतिक ' अशी एक साधारण रुपरेखा भारतीय नीतिशास्त्र सांगते.

भारतीय तत्वज्ञानास ' दर्शन ' असे म्हणण्याची पध्दत आहे. अशी एकूण 9 दर्शने आहे. या दर्शनाची विभागणी आस्तिक आणि नास्तिक अथवा वैदिक आणि अवैदिक अशी केलेली आहे.सर्व दर्शनांमध्ये व्यापक पातळीवरील नैतिक चिंतन आहे.चांगले आचरण म्हणजे काय ? आदर्श जीवन म्हणजे काय ? या समस्येचा विचार सर्व दर्शनांमध्ये आढळतो.सर्व दर्शनांनी काही नैतिक सिध्दांत मान्य केलेले आहेत.त्यातील प्रमुख पुढील विचारांचा परिचय आपण करून घेवू :

1. ऋत, ऋण
2. धर्म, कर्म, निष्काम कर्म
3. पुरुषार्थ
4. प्रेयस आणि श्रेयस

### 1. ऋत, ऋण

1) **ऋत :** हे विश्व चालविणारी एक नियंत्रक शक्ती आहे,अशी ऋग्वेदकालात धारणा होती. ती केवळ या विश्वाची चालक नाही तर माणसांमधील नीतीचे आदेश देणारी आहे.नीतीचे पालन करावयास लावणारी ती नीतीव्यवस्थाही आहे.या शक्तिला ऋत म्हणतात.

2) **ऋण :** दुसऱ्याचे घेतलेले त्यास परत करणे म्हणजे ऋणमुक्ती.त्यास परत करावयाचे धन ते ऋण.ही संकल्पना नंतर व्यापक बनली व चार प्रकारचे ऋण मानण्यात आले.ते पुढीलप्रमाणे :

(अ) देवऋण : जीवनदान व जगण्याची साधने देणाऱ्या दैवीशक्ती / ईश्वराचे ऋण फेडणे

(ब) ऋषिऋण : ज्ञानदान करणाऱ्या ऋषिमुनींचे विद्यार्थ्यांवर खूप मोठे ऋण असते. ते त्याने वेदांचा अभ्यास करून व त्यांना दक्षिणा देवून फेडणे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

(क) पितृऋण : पूर्वजांनी सर्व प्रकारच्या संकटांशी सामना करून आपले रक्षण,संवर्धन केले त्यांचे ऋण आपण स्वत: गृहस्थाश्रम स्वीकारून प्रजोत्पादन करून फेडणे. पितृ = पालक / पितर.

(ड) मनुष्यऋण : मानवजात सहकार्याने अस्तित्वात राहाणे = एकमेका साह्य करू / अवघे धरू सुपंथ !

## 2. धर्म, कर्म, निष्काम कर्म

### धर्म :

'धर्म' आणि 'Religion' यांची व्युत्पत्ती :

धर्म = धारण करणारे तत्व. ' धृ ' या धातूनपासून धर्म संज्ञा बनते. म्हणून समाज धारण करणारे म्हणजेच वेगवेगळ्या लोकांना एकत्र आणून समाज निर्मिती करणारा एक व्यापक नियम.

Religion हा शब्द Religio या लॅटीन शब्दपासून बनतो.त्याचा मूळ धातू releg ' असा असून 'एकत्र असणे किंवा बांधून ठेवणे, हा त्याचा अर्थ आहे.

प्राचीन काळी धर्म हा शब्द ' विधी ' या अर्थाने वापरला जात असावा.विधी म्हणजे विशिष्ट प्रकारचे कर्मकांड होय. प्राचीन भारतातील धर्म किंवा इतर देशातील कोणतीही धर्मकल्पना पाहाता ' संपूर्ण मानवी समाजाचे जीवन , त्याचे कल्पनाविश्व आणि क्रिया यांचे नियंत्रण करणारी एक परिपूर्ण सत्ता, एक अस्तित्व अथवा नियंत्रक तत्त्व ' हा धर्माचा समान अर्थ म्हणता येईल. या व्यवस्थेने दिलेल्या आज्ञांचे पालन करणे म्हणजे **'धर्मनिष्ठा** ' होय.

### धर्माची वैशिष्ट्ये :

(1) धर्माचा विकास टोळीधर्म (प्राचीन टोळ्यांचा धर्म ),राष्ट्रधर्म (हिंदु,इस्लाम,खिश्चन इ.)ते विश्वधर्म (मानवतावादी
बुध्दधर्म ) असा झाला.

(2)कोणताही धर्मविचार मुख्यत: ईश्वर, पाप-पुण्य,स्वर्ग-नर्क, आत्मा, अमरता मोक्ष,कर्म, कर्मसिध्दान्त,नशीब नियति इत्यादी संकल्पनांशी जोडला जातो.

(3) गेल्या दोन सहस्त्रकात राष्ट्रीय धर्माला वैश्विक धर्माचे स्वरुप देण्यातून धर्माचा विचार झाला. आणि धर्मसंस्था किंवा सांप्रदायिक धर्म म्हणून हिंदू, ख्रिश्चन,इस्लाम , बौध्द,जैन इत्यादी 11 धर्म जगात उदयास आले.धर्म एकदा संस्थेत रुपांतरीत झाला की त्यास संस्थापक येतो , धर्मग्रंथ येतो , त्यांचे व्यक्तिगत व सामुहिक जीवनप्रणालीकरण येते. आणि प्रत्येक धर्म मुळात कोणतीतरी जीवनतत्त्वे सांगतो. तीच सर्वोच्च असल्याचा दावा करतो आणि तिचा प्रसारप्रचार करु पाहातो.तिथे वाद सुरु होतो.

(4)'धर्म' या संज्ञेचे दोन मुख्य अर्थ भारतीय तत्त्वज्ञानात आहेत.

**पहिला अर्थ म्हणजे लोकांचे वागणुकीचे** नैतिक नियम.'धृ' या धातूपासून धर्म ही संज्ञा बनते.'धृ' म्हणजे धारण करणे.म्हणून धर्म म्हणजे लोकांनी धारण करावा असे तत्त्व.*थोडक्यात धर्म म्हणजे व्यक्तीने स्वत:शी आणि परस्परांशी योग्य व नैतिक आचरण करण्याचे सार्वत्रिक स्वरुपाचे नियम.*

**दुसरा अर्थ** वर्णजातिव्यवस्थेनुसारचा असून व्यक्तिने आपआपल्या वर्णजातीलिंग यानुसार धर्मपालन करणे असा आहे.ब्राह्मणाने ज्ञानसाधना करावी, क्षत्रियाने समाजरक्षण आणि राजकारण करावे,वैश्याने व्यापारउदिम इत्यादी समृध्दिची कामे करावीत तर शूद्राने या तीनही वर्णीयांची सेवा करावी. यास **स्वधर्म** म्हंटले आहे.पण हा शूद्रजातीवर अन्यायकारक असल्याने तो आज सुधारण्यात आला आहे.

### कर्म

कर्म म्हणजे कृती.व्यक्तीची कोणतीही हालचाल म्हणजे कर्म.ही हालचाल कळत नकळत कशीही होवो प्रत्येक कृती हे कर्मच असते.कर्म या शब्दाचे दोन अर्थ होतात : .

**अ) व्यापक अर्थ :** कोणतीही शारिरीक अथवा मानस्कि कृती कळत किंवा नकळत करणे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

**ब ) संकुचित अर्थ :** जन्म बारसे, लग्न, मृत्यू, श्राध्द इत्यादी सर्व प्रकारची कर्मकांडे .

व्यक्ती करीत असलेली कोणतीही कृती म्हणजे कर्म.त्या कृतीचे व्यक्तीला भान असे अथवा नसो, अज्ञानातून करा व ज्ञानातून करा; हेतूपूर्वक किंवा निर्हेतूक करा,जागेपणी करा किंवा झोपेत करा, कशीही कृती केली तरी ती 'कर्मच' असते.जाणते अजाणते,आवडते न आवडते कसेही कर्म केले तरी कर्मच असते.झोपेत चालणारी व्यक्ती उंचावरुन पडली किंवा तिने कोणाचा खून केला तर अनुक्रमे तिचे हातपाय मोडणार किंवा तिला शिक्षा होणारच.अजाणतेपणे बाळाने विस्तव उचलला तरी त्याचा हात भाजणारच.खोकल्याचे औषध म्हणून उंदीर मारण्याचे औषध घेतल्याने तर आजारी होणार किंवा मरणार.



आपण जसे कर्म करु तसे फळ मिळते.जर कर्म भौतिक असेल फळ भौतिक असते. कर्म जर मानसिक असेल तर त्याचे फळ मानसिक असते. हात अग्नीत घातला तर ' भाजणे ' हे फळ मिळते, मनातून आशीर्वाद दिला तर मनाला ' आनंद ' होतो. ( तर शिव्या दिल्या तर आपल्याच मनाला आनंद होईलही पण समोरून फल येतेच ! )

' कर्म केले आणि फळ टळले ' असे कधीही होत नाही. कर्माचा परिणाम म्हणून फळ येतेच.हा **कर्मसिध्दान्त** होय.कर्माच्या फलरुपी परिणामास 'विपाक' असे म्हणतात.त्यामुळे कर्मसिध्दांतास **'कर्मविपाक सिध्दांत'** किंवा **'कर्मफलसिध्दान्त '** असेही नाव आहे.

काही वेळेस कर्माचे फल त्वरित न मिळता काही काळाने मिळते. कर्म घडून गेल्यानंतर काही काळाने, काही तासाने, काही दिवसांनी काही वर्षांनी का होईना कर्म फळ मिळतेच.कर्म व कर्म फळ तातडीनेच मिळाले पाहिजे असे नव्हे. पण समजा कर्म केले पण फळ प्राप्ती पूर्वीच ती व्यक्ती मेली तर ?

-- पुढच्या जन्मी मिळते. ते कर्म त्या व्यक्तिबरोबरच राहाते.

समजा त्याही जन्मात मिळाले नाही तर ?

------- त्याच्या पुढच्या जन्मी मिळते.

अशा रितीने मागच्या जन्मात केलेल्या कर्माचे फळ या जन्मात भोगावे लागते ! किंबहुना जो जन्म मिळतो तोच कदाचित आधीच्या जन्मातील कर्माचे फल म्हणूनच असू शकतो.म्हणजे ना कर्म टाळता येते ना फळ टाळता येते.बरे,या जन्मातही जे कर्म होईल त्याचेही फळ त्यात जमा होत राहाते.त्या नव्या कर्माचे फलही भोगावे लागते. त्यासाठी नवा जन्म घ्यावा लागतो.पुन्हा त्या नव्या जन्मात जुने कर्मफल आणि त्या नव्या जन्मातील नवे कर्मफल जमा होते. हे सतत होत राहाते.कर्मामुळे जन्म, पुन्हा जन्मामुळे कर्म ; असे चक्र फिरत राहते.

## निष्काम कर्म

पण असे जर झाले तर मोक्ष कसा मिळणार ? कारण मोक्ष हे आपले ध्येय आहे .

तर तो मिळतो. कर्मचक्रातून सुटता येते ! कसे ? तर पुढील प्रमाणे :

कर्म करावयाचे आणि पण फळ टाळावयाचे.कर्मसिध्दान्ताच्या मते कर्म करून ही फळ टाळणे शक्य आहे.कर्मफल अटळ आहे, असे वाटले तरी साधारणत: असे घडते की फल अटळ असते तरी आपणही फलाची इच्छा धरीत असतो.त्यामुळेही ते मिळतेच.खरे तर तसेच घडते.म्हणून चक्रातून सुटावयाचा एकच मार्ग राहतो.तो म्हणजे ' निष्काम कर्म ' करावयाचे.कर्म करावयाचे पण कर्मफलाची इच्छा न करता केवळ कर्म करावयाचे म्हणून कर्म करावयाचे ! मनातून फलाची अपेक्षा काढून टाकायची .

निष्काम कर्म म्हणजे मनात कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपले कर्म करणे.मग असे कर्म कोणत्या भावनेने करावयाचे ? तर केवळ ' कर्तव्य ' म्हणून करावयाचे. असे करणे म्हणजे निष्काम कर्म करणे.अशा कर्तव्य प्रधान जीवनाला **'निष्काम कर्मयोग '** असे नाव भगवतगीतेत दिलेले आहे.अशा व्यक्तीला 'कर्मयोगी ' असे म्हणतात.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

गीता, उपनिषदे, संत साहित्य या सगळयांतून निष्काम कर्मयोग पुरस्कारलेला आढळतो. सर्व जाती धर्मातील साधु संत महात्मे असेच निष्काम कर्मयोगी असतात.ज्ञानेश्वरांपासून ते साईबाबा,गाडगे बाबा,संत तुकडोजी यांच्यापर्यंत सर्व समाजसेवक असे निष्काम कर्मयोगी असल्याचे आढळते . आजच्या कालातील काही कर्मयोगी म्हणजे मेघा पाटकर, अण्णा हजारे, आहिल्या रांगणेकर, रझिया पटेल इत्यादी. निष्काम कर्म केल्यास विद्यमान जन्मातच गतजन्मीच्या फलांचा नाश होतो, नवे अपूर्व होत नाही , विद्यमान अवस्थेतच मोक्ष प्राप्त होते व कर्मफल चक्रातून सुटका होते.

## 3) पुरुषार्थ

'' मी जगावे कशासाठी ? मी का जगावे ? कसे जगावे '' हे प्रश्न तात्विक आहे. त्याचे उत्तर '' कोणत्यातरी हेतूसाठी किंवा उद्दिष्टांसाठी जगावे '' असे दिले जाते.आता ' जगण्याचे उद्दिष्ट कोणते असावे ? 'हे प्रत्येक व्यक्तीच्या परीस्थिती शिक्षण जात धर्म, लिंग, आर्थिक, सामाजिक, वैचारीक रचना अशा विविध घटकांवर अवलंबून असते. कोणत्या हेतूसाठी जगावे , हे काही वेळेस लवकर लक्षात येते तर बऱ्याचदा खूप उशीरा लक्षात येते तर काही वेळेस लक्षात येत सुध्दा नाही.काही हेतू तात्कालिक असतात तर काही अमर्याद असतात. कुणी स्वार्थासाठी जगते तर कुणी परमार्थासाठी जगते.

भारतीय तत्वज्ञानात या हेतूला ' मोक्ष ' असे नाव दिले गेले. मोक्ष म्हणजे मुक्ती.मुक्ती कशातून ? तर ' जन्म मरणातून , कर्मचक्रातून ! कारण जन्म मरण म्हणजे सुखदु:खाची मालिका. यातून सुटणे म्हणजे मोक्ष . तेच मानवी जिवीताचे अंतिम उद्दिष्ट . भारतीय वैदिक दर्शनाच्या मते मोक्ष हा पुरुषार्थ आहे.पुरुषार्थ म्हणजे पुरुषाने जगण्यासाठी प्राप्त करावयाचा अर्थ .येथे पुरुष म्हणजे स्त्री किंवा पुरुष किंवा कोणती मानवी व्यक्ती व्यक्तीने जे ध्येय बाळगायचे त्यास ' पुरुषार्थ ' म्हणतात.मोक्ष हा असा अंतिम पुरुषार्थ आहे.

मोक्ष पुरुषार्थ हे असे जीवनध्येय आहे की जे प्राप्त केल्यानंतर आणखी काही नवे मिळवायचे नसते. पण हे थेट मिळवावयाचे नसते.आणि ती मिळविण्याची विशिष्ट प्रकारे जीवन जगून मिळवावयाचे असते. शिवाय ते प्रत्येक व्यक्तीने ते मिळविण्याचे आहे पुरुषार्थ ही खास वैदिक हिंदूंची संकल्पना आहे असे एकूण चार पुरुषार्थ आहेत.

1) धर्म 2) अर्थ 3) काम 4) मोक्ष

या प्रत्येकाचे स्वरुप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### 1) धर्म पुरुषार्थ :

धर्म हा पायाभूत पुरुषार्थ होय. इथे धर्म याचा अर्थ हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन इ. नाही. तर येथे धर्म म्हणजे नैतिक नियम असा अर्थ होय. महाभारतात' धारणात इत्याहू धर्म , धर्मो धारयति प्रजा ' अशी व्याख्या दिली जाते. प्रजेला धारण करणारे आणि प्रजेकडून धारण केले जाणारे तत्व किंवा नियम म्हणजे धर्म. असा त्याचा अर्थ आहे. म्हणून धर्म म्हणजे नियम असे होय. हिंदू , इस्लाम इ. संप्रदाय आहेत. ते स्वत: धर्म नव्हेत असे लक्षात ठेवले पाहिजे.धर्म म्हणजे आधार देणे पोषण करणे, पालन करणे, नैतिक कायदे आचरणाचे नियम असा त्याचा अर्थ आहे. थोडक्यात धर्म म्हणजे योग्य आचरण.

' धृ ' या धातूपासून धर्म ही संज्ञा बनते. ' धृ ' म्हणजे धारण करणे. म्हणून धर्म म्हणजे लोकांनी धारण करावा असे तत्त्व. लोकांना एकत्र आणणारा धर्म ही या अर्थाने सामाजिक संकल्पना आहे. व्यक्ती व समाज यांनी काय करावे ? कसे वागावे ? कोणती आचार संहिता आचरणात आणावी ? व्यक्ती व समाजाने परस्परांशी कसे वागावे ? याचे नियम कोणते या सगळयाची चर्चा धर्म या संकल्पनेत आहे. बौध्द तत्वज्ञानात धर्म म्हणजे निसर्गाचे नियम असे सांगितले आहे.

*थोडक्यात धर्म म्हणजे व्यक्तीने स्वत:शी आणि परस्परांशी योग्य व नैतिक आचरण करण्याचे नियम.*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org,9226563052*

समाज ही परस्पर नात्याची गुंफण असते. ती नाती रक्ताचीच असतात असे नाही. ते नाते माणूसकीचे असते. हे लक्षात घेता परस्परांशी प्रेमाने, स्नेहाने नीतीने वागणे म्हणजे धर्म होय. धर्म हा या अर्थाने नैतिक पुरुषार्थ आहे. धर्म म्हणजे नीती. धर्म ही एकूण पुरुषार्थ संकल्पनेतील मूलभूत संकल्पना होय.

तथापि कालांतराने धर्म संकल्पनेत शिक्षण या संकल्पनेचा सामावेश करण्यात आला. शिक्षण कशाचे तर प्रत्येक व्यक्तीने कोणते नैतिक नियम पाळावे याचे .व्यक्तीला समाजात विशिष्ट स्थान असते. इतर प्रत्येकाशी तिची एक निश्चित भूमिका असते.तिच्या विधिध प्रकारच्या शारीरीक, मानसिक, वैचारीक क्षमता असतात. अशा विविध संदर्भात ती व्यक्ती समाजात वर्तन करते. साहजिकच त्या वर्तनाचे नियम बनविले जातात. ते नियम त्या व्यक्तीला तिच्या शिक्षणातून मिळतात. कुणी कुणाशी कसे वागावे ? आपली कर्तव्य कोणती याचे प्रशिक्षण म्हणजे धर्म असे म्हटले गेले. व त्याप्रमणे जे शिक्षण दिले गेले त्यास धर्म शिक्षण असे म्हणतात. ही धर्म शिक्षणाची शुध्द तत्वज्ञानात्मक भूमिका होती.तथापि या संकल्पनेत प्राचीन भारतात अन्य दुसऱ्या एका सामाजिक संकल्पनेची मिसळण झाली. ती संकल्पना म्हणजे वर्ण आणि जाती व्यवस्था होय.मुख्यत्वे करुन वर्ण व्यवस्था धर्म संकल्पनेत मिसळली जाऊन धर्माचे स्वरुप वर्ण प्रधान बनले.

## 2) अर्थ पुरुषार्थ :

अर्थ म्हणजे पैसा जो जगण्यासाठी अत्यावश्यक असतो.रोख स्वरुपातील पैसे हे अर्थात अर्थाचे शुध्द स्वरुप होय.सोने, अन्नधान्य माणसे, ही पैशाचीच वेगवेगळी रुपे आहेत. पैसे मिळविणे किंवा पैशााची वेगवेगळी रुपे प्राप्त करणे म्हणजे अर्थ पुरुषार्थची साधना करणे होय.

धर्म पुरुषार्थांची प्राप्ती झाल्यांनंतर म्हणजेच शिक्षण पूर्ण केल्यानंतर व्यक्तीने अर्थाची साधना करावी तरच तीला गृहस्थ जीवन जगता येते. संसारात लागणारे धान्य, कपडे, घर, शिक्षण इ. साठी पैशाची नितांत गरज असते. हा पैसा कसा मिळवावा ? तर काम करुन मिळवावा.पण आपणास किती पैशाची गरज आहे ? आपल्या किमान गरजा पूर्ण होतील एवढाच मिळवावा.लुबाडणूक,फसवणूक,चोरी करुन मिळविणे ही सगळी अधर्म साधने आहेत. जास्त पैसे मिळवणे जसा अधर्म आहे तसा गरजेपेक्षा कमी मिळविणे हा सुध्दा अधर्मच आहे.

पैसा हे केवळ साधन आहे.साध्य नाही. पण माणसे साधनालाच साध्य समजतात.आणि अधर्माचा उदय होतो.म्हणूनच अर्थ पुरुषार्थावर धर्म पुरुषार्थाचे नियंत्रण असले पाहिजे.मोक्ष हे साध्य तर अर्थ हे साधन आहे. याची जाणीव ठेवणे याला **साध्यसाधन विवेक** असे म्हंटले आहे.हा साध्यसाधन विवेक सर्व जाती धर्मांच्या सर्व स्त्री पुरुषांना उपयुक्त आहे.

## 3) काम पुरुषार्थ :

काम म्हणजे कामवासना होय.कामपुर्तीसाठी प्राचीन भारतीयांनी विवाह बंधन हा कायदेशीर व समाजमान्य मार्ग शोधला.विवाहाद्वारे स्त्री पुरुषांना मनसोक्त कामउपभोग घ्यावा.विवाह बाह्य संबंध टाळावे.विवाह ही नैतिक बाब आहे, असे ते म्हणतात. म्हणून विवाह बाह्य संबंधांना ते अनैतिक मानतात.कामवासनेकडे पाहण्याचा प्राचीन ऋषीमुनींचा उद्देश धार्मिक होता. अत्यावश्यक धर्मकृत्य म्हणून त्यांनी कामकृतीला परवानगी दिली.व्यक्तीने प्रथम धर्म व नंतर काम अशाच क्रमाने त्याची प्राप्ती करावी. असे त्याचे म्हणणे होते.

समाजात दुरिते निर्माण करण्याची क्षमता अर्थ व कामात असल्यामुळे,विशेषत: कामात ती जास्त असल्यामुळे लग्न म्हणजे कामतृप्तीचा मार्ग हा धार्मिक स्वरुपाचा असला पाहिजे असे भारतीय ऋषीमुनी म्हणतात. थोडक्यात लग्न बंधन हा धार्मिक विधी असावा असे ते म्हणतात.सर्व धर्म हाच दृष्टीकोन बाळगतात.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org,9226563052



## 4) मोक्ष पुरुषार्थ

मोक्ष म्हणजे मुक्ती किंवा सुटका . कशापासून ? तर बंधनापासून ? ते कशाचे ? संसाराचे ! पर्यायाने कामवासना आणि पैशाची हाव यांचे. तीव्र कामवासना आणि अनंत इच्छा यातून कायमची सुटका म्हणजे मोक्ष. मोक्ष हा शेवटचा पुरुषार्थ होय. तो साध्य पुरुषार्थ आहे.

अर्थ व काम या पुरुषार्थांची साधना करतांना माणूस त्यास अडकतो.एक इच्छा झाली की दुसरी निर्माण होते .असे सतत घडत राहून वासना तयार होते.मग इच्छा पूर्तीसाठी काहीतरी कर्म करावे लागते.त्याचे फळही भोगावे लागते. या जन्मात नाही तर पुढच्या जन्मात का होईना कर्मफल भोगावेच लागते. त्याचेही नवे कर्म तयार होते. मग त्याचेही फळ येते मग 'मरा, पुन्हा जन्माला या , पुन्हा मरा ' असे जन्ममरण सुरु राहते .या जन्म मरणाच्या चक्रातून सुटणे म्हणजे मोक्ष.

कसा असतो मोक्ष ? तर तो ' सद चित आनंद ' स्वरूप असा असतो. तेच ब्रह्म होय. हे ब्रह्म निर्गुण निराकार आहे. तेच प्रत्येक जीवाचे स्वरुप असते. पण वासना, लोभ या माया मोहामुळे व्यक्ती आपले सच्चिदानंद स्वरुप विसरते आणि जन्म मृत्यूच्या चक्रात अडकते .यातून सुटका म्हणजे मोक्ष होय. हिंदुंची ही पुरुषार्थ संकल्पना बौध्द व जैन धर्मानेही स्विकारली .ते मोक्षाला निर्वाण म्हणतात.

आता, पुरुषार्थ सिध्दांत संत साधू यांच्यासाठी नाही. तो सर्व सामान्यांसाठी आहे कारण संत साधूसंतांकडून थेट मोक्षाकडे जाऊ शकतात पण सामान्य माणसे जाऊ शकत नाही. त्यामुळे पुरुषार्थ सिध्दांत हा सामान्यांसाठी आहे. साधारणपणे हिंदू धर्म माणसाचे आयुष्य 100 वर्षांचे मानतो त्याचे 4 समान भाग आहेत. त्यांना आश्रम म्हणतात. कोणत्या आश्रमात कोणता पुरुषार्थ मिळवावा ते निश्चित केलेले आहे त्याचा आराखडा पुढीलप्रमाणे. -

| अ. नं. | वय | आश्रम | पुरुषार्थ |
|---|---|---|---|
| 1 | 1 - 25 | ब्रह्मचर्याश्रम | धर्म + शिक्षण |
| 2 | 26- 50 | गृहस्थाश्रम | अर्थ + काम |
| 3 | 51 - 75 | वानप्रस्थाश्रम | |
| 4 | 76 - 100 | संन्याशाश्रम | मोक्ष निवृत्ती |

## 4) प्रेयस आणि प्रेयस :

श्रेयस आणि प्रेयस या भारतीय तत्वज्ञानातील जगण्याच्या पध्दती आहे प्रेयस म्हणजे प्रिय जे हवेसे वाटते ते . श्रेयस जे श्रेयस्कर असते ते.( प्रेयसी = हवी असणारी स्त्री,प्रियकर = हवा असणारा पुरुष)

**प्रेयस :**

जगतांना आपणास सुख देणाऱ्या अनेक गोष्टींचे आकर्षण असते विविध वस्तु, व्यक्ती, घटना ह्या प्रिय असतात. आपले भौतिक जीवन समृध्द करणाऱ्या गोष्टी हव्याहव्याशा असतात. आता , केवळ जगतांना त्या हव्याशा वाटतात असे नव्हे तर मेल्यानंतरही त्या आपणास हव्या असतात. मृत्यूनंतर आपणास केवळ स्वर्गच हवा असतो. पण जे प्रेयस असते ते श्रेयस्कर असते का ? त्यासाठी श्रेयस म्हणजे काय ? ते पाहिले पाहिजे.

**श्रेयस :**

श्रेयस म्हणजे जे योग्य, इष्ट व हितकारक असते ते. असे काही मिळविणे म्हणजे श्रेय घेणे. श्रेयस प्रिय असेलच असे नाही पण श्रेयसामध्ये आपले कल्याण असते. त्यामुळे श्रेयस प्रिय सुध्दा असले पाहिजे. अंतिमत: श्रेयस म्हणजे जे इष्ट, योग्य व हिरकारक आणि प्रिय आहे ते सुध्दा होय. मोक्ष हा श्रेयस असला पाहिजे.निवड करावयाची वेळ आल्यास प्रेयसाऐवजी श्रेयसाची निवड करणे योग्य.

-----------------------------------------------------

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner